# ‘महोत्सवांमुळे चित्रपट एकत्रितपणे पाहण्याचा अनुभव वृद्धिंगत’

## *पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे भव्य सोहळ्यात उद्घाटन*

पुणे, दि. १५ जानेवारी २०२६ : “चित्रपट हा एकत्रितपणे पाहण्याचा अनुभव आहे आणि तो आनंद कायम ठेवायचा असल्यास चित्रपट महोत्सव सुरू राहिले पाहिजेत. त्यासाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी सहकार्य करेल,” असे राज्याच्या सांस्कृतिक मंत्रालयाचे मुख्य सचिव किरण कुलकर्णी म्हणाले.

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा(पिफ)चे उद्घाटन विद्यापीठ रस्त्यावरील इ स्क्वेअर थिएटर येथे भव्य सोहळ्यात राज्याच्या सांस्कृतिक मंत्रालयाचे मुख्य सचिव किरण कुलकर्णी यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, एनएफडीसीचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश मगदूम, भारती विद्यापीठाचे कुलगुरू शिवाजीराव कदम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी, इ-स्क्वेअर थिएटरचे संचालक हेमंत पंचऽ ]मिया , महोत्सवाचे आंतरराष्ट्रीय ज्यूरी बी. जयमोहन (भारत), पिटर केरेकेस (स्लोव्हाकिया), रीट्टा आल्टो(फिनलँड), सिनू रामासामी (भारत), सेर्गी कासामीतजाना(स्पेन), येसिम उस्ताओग्लू (तुर्कस्थान) विविध देशांचे कॉन्सुल जनरल, पुणे फिल्म फाउंडेशनचे सरचिटणीस रवी गुप्ता, डॉ. मोहन आगाशे, विश्वस्त सतीश आळेकर, विश्वस्त सबिना संघवी, ज्येष्ठ चित्रपट समीक्षक व चित्रपट निवड समितीचे अध्यक्ष समर नखाते, चित्रपट निवड समितीचे सदस्य अभिजीत रणदिवे, उपसंचालक विशाल शिंदे (प्रोग्रॅम व फिल्म), उपसंचालक अदिती अक्कलकोटकर (आंतरराष्ट्रीय संपर्क व समन्वय) यावेळी उपस्थित होते. तसेच गोथे इन्स्टिट्यूटचे संचालक मार्कस बिशेल, ला फेमिस’चे संचालक निकोलस लासनिबत, फ्रेंच इन्स्टिट्यूटचे प्रतिनिधी मथीयू बेज्योत,अलायन्स फ्रँकाईसच्या संचालिका ॲमेली वायगल ,ख्यातनाम दिग्दर्शक डॅन वोल्मन आणि गोरान राडनोविक यावेळी उपस्थित होते.

एनएफडीसीचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश मगदूम म्हणाले, “भारत सरकारने वेव्ह आणि इंडिया सिने हब हे सर्व चित्रपट निर्मात्यांसाठी व्यासपीठ तयार केले आहेत.”
स्वाती म्हसे पाटील म्हणाल्या, “पिफ’ने पुण्याची सांस्कृतिक राजधानी ही ओळख पुढे नेण्यास मदत केली आहे.” दादासाहेब फाळके चित्रनगरी आणि महाराष्ट्र शासन चित्रपट महोत्सवांना मदत करत असून, चित्रपट रसास्वाद मंडळ आणि चित्रपताका हा खास मराठी चित्रपट महोत्सव सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.
पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा(पिफ)चे अध्यक्ष आणि संचालक डॉ. जब्बार पटेल यांनी प्रस्तावित केले. त्यांनी संपूर्ण महोत्सवाचा इतिहास सांगितला आणि महोत्सवाची माहिती दिली. गुरुदत्त, व्ही. शांताराम आणि ऋत्विक घटक यांच्या स्मृतीनिमित्त महोत्सव अभिवादन करत असल्याचे त्यांनी सांगितले. यावर्षी १०३ देशांमधील १३० चित्रपट दाखवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ते

म्हणाले, “पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामुळे ग्रामीण भागातील तरुण फिल्ममेकर म्हणून पुढे आले आणि मराठीमध्ये एक नवा सिनेमा आला.”

पुणे फिल्म फाउंडेशन, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व दादासाहेब फाळके चित्रनगरी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने २४ वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (पिफ) २०२६ यंदा १५ ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीत पुण्यातील १० स्क्रीनवर होत आहे.

यावेळी महोत्सवाच्या थीमचे आणि कॅटलॉगचे अनावरण झाले.

निकिता मोघे दिग्दर्शित हिंदी गाण्याच्या नृत्याचा कार्यक्रम यावेळी सादर करण्यात आला.

माजी मंत्री आणि पुण्याचे नेते सुरेश कलमाडी यांना यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली. अभिनेत्री श्रिया बुगडे आणि क्षितिज दाते यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

उद्घाटन कार्यक्रमानंतर ‘ला ग्राझिया’ (इटली) हा पावलो सोरेंटीनो दिग्दर्शीत चित्रपट दाखवण्यात आला’

महोत्सवाचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन www.piffindia.com या संकेतस्थळावर तसेच सर्व थिएटर्सवर प्रत्यक्ष रजिस्ट्रेशन सुरू आहे.

-------